एस.सी.सी. क्र. १२४/२०२५
सरकार विरुध्द ईश्वर
निशाणी क्र. १३

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. १ यांची जबानी**
**मी प्रतिज्ञा पुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – प्रभाकर निवृत्तीराव कच्छवे,
वय – ५३ वर्ष,
धंदा – नोकरी, पोलीस हवालदार. ब. नं. ९८२,
नेमणूक पोस्टे– चुडावा, ता. पूर्णा जि. परभणी.

**सरतपास सरकार तर्फे श्रीमती व्ही. के. नरवाडे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे मार्फत**

१. दिनांक २२.०७.२०२४ रोजी मी पोलीस ठाणे चुडावा येथे पोलीस हवालदार या पदावर कार्यरत होतो. सदर दिवशी मी, तसेच पोलीस हवालदार थोरे, पोलीस कॉन्स्टेबल मिटके यांच्यासोबत अवैध धंदयाविरुध्द कार्यवाही करण्याकरिता खाजगी वाहनाने कावलगांव बिट हद्दीकडे रवाना झालो. त्यावेळी रुंज फाटा येथे पोहचलो असता गुप्त बातमीदाराकडून बातमी मिळाली की, एक इसम कावलगांव आठवडी बाजारामध्ये लोकांकडून पैसे घेवून जुगार नावाचा मटका खेळत आहे. त्यावेळी आम्ही दोन पंचांना सदर गोष्टीची कल्पना देवून सोबत घेवून कावलगांव येथील आठवडी बाजारामध्ये लिंबाच्या झाडाखाली छापा टाकला असता एक इसम जुगार नावाचा मटका खेळत असल्याचे आढळून आले. सदर इसमास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव ईश्वर प्रभुलाल जैस्वाल असल्याचे सांगितले. दोन पंचासमक्ष सदर इसमाची अंगझडती घेतली असता त्याच्या ताब्यातून ५६० रुपये रोख रक्कम, तसेच जुगाराचे साहित्य मिळून आले.

२. सदर पंचाना मी जप्ती पंचनामा करण्यासंदर्भात नोटीस दिली होती. आता मला अभिलेखावरील दिनांक २२.०७.२०२४ रोजीची नोटीसची मुळ प्रत दाखविण्यात आली. ही तीच नोटीस असून त्यावर माझी तसेच दोन पंचाच्या सह्या आहेत. सदर नोटीसस **निशाणी क्र. १४** देण्यात येते. आता मला अभिलेखावरील जप्ती पंचनामा दाखविण्यात आला, त्यावर माझी सही

असून पंचाची, तसेच आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर असून त्यास **निशाणी क्र. १५** देण्यात येते. त्यानंतर सदर आरोपीविरुध्द मी पोलीस स्टेशनला जावून फिर्याद दिली. आता मला सदर फिर्याद दाखवली, ही तीच आहे, त्यातील मजकूर बरोबर आहे, त्यावर माझी सही आहे, करीता त्यास **निशाणी क्र. १६** देण्यात येते. मी आरोपीस पाहिल्यास ओळखु शकतो, आजरोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. बी. आर. लोखंडे यांच्या मार्फत**

३. चुडावा पोलीस ठाण्यापासून कावलगांव येथील अंतर सुमारे दहा किमी आहे. आठवडी बाजार असल्यामुळे सदर ठिकाणी वर्दळ असते. प्रस्तुत गुन्ह्यात जप्त केलेल्या रोख रकमेतील चलनी नोटांचे नंबर मी नमूद केलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, प्रसतुत प्रकरणात जप्त रोख रक्कम जुगाराचे साहित्य व आरोपीचा काही एक संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीच्या माहिती आधारे प्रस्तुतची फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा जप्ती पंचनामा तयार करुन प्रस्तुत प्रकरणात दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा असून आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वाक्षरीत/–
(एस. एस. साळुंखे)
दिनांक – १५.०६.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
पूर्णा.